**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर आंबा व डाळिंब या फळपीकांचा सुधारित फळबाग लागवड कार्यक्रम राबविणे बाबत.**

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०१३/प्र.क्र.११८/मग्रारो-१,
नियोजन (रोहयो) विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१४

**संदर्भ :**

१) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०११/प्र.क्र.५८/रोहयो-१०अ, दिनांक २९ जून, २०११

२) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०११/प्र.क्र.१३२/रोहयो-१०अ, दिनांक २० जानेवारी, २०१२

३) नियोजन (रोहयो) विभाग, शासन आदेश क्रमांक : बैठक-२०१३/प्र.क्र.११८/मग्रारो-१, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३

४) अप्पर मुख्य सचिव, कृषि विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा दिनांक १३ डिसेंबर, २०१३ चा अहवाल

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर फळबाग लागवडीचा कार्यक्रम संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक २९ जून, २०११ च्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायती मार्फत व संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २० जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयान्वये कृषि विभागामार्फत राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत मजुरीचे दर हे केंद्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या मजुरीदरानुसार असून साहित्याचे दर हे राज्य रोहयो अंतर्गत निश्चीत केलेल्या दरानुसार विहित करण्यात आलेले आहेत.

२. मजुरीचे दर हे वेळोवेळी अद्यावत करण्यात आलेले आहेत. तथापि, सामुग्रीचे दर हे अद्याप पर्यंत अद्यावत करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सामुग्रीचे दर अद्यावत करण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ च्या शासन आदेशान्वये अप्पर मुख्य सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक १३ डिसेंबर, २०१३ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर समितीने आंबा व डाळिंब या फळपीकांचे दर सुधारित करून अंदाजत्रके सादर केली आहेत. त्यानुषंगाने आंबा व डाळिंब या फळपीकांचा सुधारित फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबत शासन खालील निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर आंबा व डाळिंब या फळपीकांचा सुधारित फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता

देण्यात येत आहे. या सुधारित फळबाग लागवड कार्यक्रमात लागवड करावयाच्या आंबा व डाळिंब या फळपीकांचे सुधारित अंदाजपत्रके अनुक्रमे परिशिष्ट १ अ व परिशिष्ट १ ब मध्ये देण्यात आलेले आहेत.

२. सदर सुधारित फळबाग लागवड कार्यक्रम हा सन २०१४-१५ या अर्थिक वर्षापासून राबविण्यात यावा. तथापि, ज्या ठिकाणी सिंचनाची सोय आहे त्या ठिकाणी या वर्षापासून लागू करण्यास हरकत नाही.

३. सदर सुधारित फळबाग लागवड कार्यक्रमामध्ये प्रत्येक जॉबकार्डधारक लाभधारक कुटूंबास किंवा इतर जॉबकार्डधारक कुटूंबास प्रती वर्षी १०० दिवस मनुष्यदिन इतकाच रोजगार अनुज्ञेय राहील.

४. उपरोक्त सुधारित फळबाग लागवड कार्यक्रमासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१. लाभार्थी व इतर मजुर हे जॉबकार्डधारक असावेत.
२. लाभार्थी हा उपरोक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या अनुज्ञेय प्रवर्गातील असावा.
३. प्रत्येक अठवड्याचे हजेरी पत्रक नियमितपणे ठेवून ते पूर्ण झाल्यावर १५ दिवसांत मजुरी प्रदान करणे आवश्यक राहील.
४. संपुर्ण फळबाग लागवड कार्यक्रमासाठी पुर्व हंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड करणे, पाणी देणे, किटकनाशके/औषध फवारणी व झाडांचे संरक्षण करणे ही कामे लाभधारकाने प्रथम: स्वत: करणे आवश्यक आहे. मात्र १०० दिवस झाल्यानंतर इतर जॉबकार्डधारक मजुरांकडून कामे करुन घ्यावीत. अशाप्रकारे नियोजन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
५. मजुरीची रक्कम फक्त पोस्ट/बँकेमार्फतच दिली जाईल.
६. ग्रामसभा व ग्रामपंचायत यांची मान्यता आवश्यक आहे.
७. आवश्यक प्रमाणपत्रे जसे जातीचा दाखला, दारिद्रय रेषेखालील दाखला, सातबारा इ. प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
८. ग्रामरोजगार नोंदवहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.
९. MIS वरील सर्व प्रकारच्या नोंदी घेणे.
१०. प्रकल्पस्थळावर फलक लावणे.
११. या सुधारित फळबाग लागवड कार्यक्रमात अवलंबावयाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यपद्धत ही उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे असावी.
१२. प्रत्येक लाभार्थ्याच्या जमिनीवरील फळबाग लागवड कार्यक्रम हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात यावा. अशा प्रत्येक प्रकल्पाला प्रशासकिय व तांत्रिक मान्यता स्वतंत्रपणे देण्यात यावी तसेच प्रत्येक प्रकल्पाला MIS वर नोंद घेण्यासाठी स्वतंत्र संगणक क्रमांक देण्यात यावा.
१३. उपरोक्त कार्यक्रमाचे सामाजिक अंकेक्षन करणे आवश्यक आहे.
१४. रोपांची लागवड झाल्यानंतर जिवंत रोपांची टक्केवारीची तपासणी संबंधित ग्रामसेवक व कृषि सहाय्यक यांनी करावी व ७५ टक्के जीवंत रोपांची टक्केवारी असल्याच मजुरी व सामुग्रीचा खर्च देण्यात यावा.
१५. या कार्यक्रमांतर्गत होणारा साधनसामुग्रीवरील खर्च खालीलप्रमाणे करण्यात यावा.
   १) कलमे/रोपे यावर होणारा खर्च (कृषि विभागाने बिल/व्हाऊचर सादर केल्यानंतर) धनादेश/ईएफएमएस द्वारे कृषि विभागास प्रदान करावा.
   २) निविष्ठा जसे खते, औषधे व इतर साहित्य यावर होणा-या खर्चाची रक्कम (व्हाऊचर सादर केल्यानंतर) धनादेश/ईएफएमएस द्वारे लाभार्थ्यास अदा करावे.

१६. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयात नमूद केलेल्या अंमलबजावणीच्या इतर कार्यपदधतीचे पालन करण्यात यावे.

५. उपरोक्त सुधारित फळबाग लागवड कार्यक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना संचालक, फलोत्पादन यांनी निर्गमित कराव्यात व सदर सूचना सर्व संबंधित क्षेत्रीय यंत्रणेच्या निदर्शनास आणाव्यात. तसेच या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनूसार तांत्रिक मार्गदर्शक संचालक, फलोत्पादन यांनी करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१४०२२०११०८०४४४१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि.गि./१२/२०

**(व्ही. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रति,

मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अतिरिक्त मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक,
अतिरिक्त मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक,
आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपूर,
विभागीय आयुक्त, (सर्व),
आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)
उपायुक्त (रोहयो) (सर्व),
जिल्हा कार्यक्रम समन्वयक (एमजीनरेगा) तथा जिल्हाधिकारी,(सर्व),
उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (एमजीनरेगा) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) (सर्व),
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
उप सचिव, अवर सचिव व कार्यासन अधिकारी, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व)
निवडनस्ती रोहयो-१

## परिशिष्ट-१ अ

### महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजेनंतर्गतफळबाग लागवड कार्यक्रमाकरीता प्रति हेक्टर खर्चाचे मापदंड

(मजूरी दर रुपये १६२ प्रमाणे)

फळपिकाचे नाव- आंबा कलमे    हेक्टरी झाडे संख्या -१००    अंतर-१०*१०

| अ.क्र. | घटक | पहिले वर्ष | | | | दुसरे वर्ष | | | | तिसरे वर्ष | | | | एकुण | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | |
| अ | **लागवडपुर्व कामे** | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमिन तयार करणे | ६४८० | ० | ६४८० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६४८० | ० | ६४८० | ४० | |
| २ | खड्डे खोदने | ७१२८ | ० | ७१२८ | ४४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७१२८ | ० | ७१२८ | ४४ | |
| ३ | कुपन करणे | ९७२० | ० | ९७२० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ९७२० | ० | ९७२० | ६० | |
| | **एकुण अ** | **२३३२८** | **०** | **२३३२८** | **१४४** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२३३२८** | **०** | **२३३२८** | **१४४** | |
| ब | **लागवड करणे** | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | माती व खत मिश्रण खड्डे भरणे | ३२४० | ६००० | ९२४० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३२४० | ६००० | ९२४० | २० | |
| २ | कलमाची लागवड करणे | ३२४० | ४००० | ७२४० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३२४० | ४००० | ७२४० | २० | |
| | **एकुण ब** | **६४८०** | **१००००** | **१६४८०** | **४०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **६४८०** | **१००००** | **१६४८०** | **४०** | |
| | **एकुण(अ+ब)** | **२९८०८** | **१००००** | **३९८०८** | **१८४** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२९८०८** | **१००००** | **३९८०८** | **१८४** | |
| क | **परिरक्षण करणे** | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ६४८ | ० | ६४८ | ४ | ० | ० | ० | ० | ६४८ | ० | ६४८ | ४ | |
| २ | खते देणे | ८१० | २७०० | ३५१० | ५ | ३२४० | ३४०० | ६६४० | २० | ३२४० | ३४०० | ६६४० | २० | ७२९० | ९५०० | १६७९० | ४५ | |
| ३ | आंतर मशागत | ४०५० | ० | ४०५० | २५ | ४०५० | ० | ४०५० | २५ | ४०५० | ० | ४०५० | २५ | १२१५० | ० | १२१५० | ७५ | |
| ४ | पिकसंरक्षण | १६२० | ५०० | २१२० | १० | १६२० | १००० | २६२० | १० | १६२० | १००० | २६२० | १० | ४८६० | २५०० | ७३६० | ३० | |
| ५ | पाणी देणे | १२९६० | ० | १२९६० | ८० | १२९६० | ० | १२९६० | ८० | १२९६० | ० | १२९६० | ८० | ३८८८० | ० | ३८८८० | २४० | |
| ६ | इतर संकीर्ण | १६२० | ० | १६२० | १० | ८१० | ० | ८१० | ५ | ८१० | ० | ८१० | ५ | ३२४० | ० | ३२४० | २० | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकुण क | **२१०६०** | **३२००** | **२४२६०** | **१३०** | **२३३२८** | **४४००** | **२७७२८** | **१४४** | **२२६८०** | **४४००** | **२७०८०** | **१४०** | **६७०६८** | **१२०००** | **७९०६८** | **४१४** | |
| | **एकुण(अ+ब+क)** | **५०८६८** | **१३२००** | **६४०६८** | **३१४** | **२३३२८** | **४४००** | **२७७२८** | **१४४** | **२२६८०** | **४४००** | **२७०८०** | **१४०** | **९६८७६** | **२२०००** | **११८८७६** | **५९८** | |

१ पहिल्या वर्षी आंबा पिकाकरीता एकूण ३१४ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यापैकी १८४ मनुष्य दिवस लागवडपूर्व कामे व लागवड करण्याकरीता आहे त्यापैकी १०० मनुष्य दिवस लाभधारक कुटूंबास व उर्वरित ८४ दिवस दुस-या कुटूंबास देय राहील. तसेच परिरक्षणाकरीता १३० मनुष्य दिवसांपैकी इतर तिस-या कुटूंबास १०० मनुष्य दिवस व उर्वरित ३० दिवस चौथ्या कुटुंबास नियमानुसार देय राहील.

२ दुस-या वर्षाकरीता जुलै व ऑगस्ट महिने वगळून दहा महिन्याकरीता परिरक्षणासाठी १४४ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यामध्ये लाभधारकास १०० दिवस व दुस-या कुटुंबातील व्यक्तीस ४४ मनुष्य दिवस मजूरी देय राहील.

३ तिस-या वर्षाकरीता जुलै व ऑगस्ट महिने वगळून दहा महिन्याकरीता परिरक्षणासाठी १४० मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यामध्ये लाभधारकास १०० दिवस व दुस-या कुटुंबातील व्यक्तीस ४० मनुष्य दिवस मजूरी देय राहील.

४ ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांचे दिनांक २२/११/२०१३ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत देय असलेल्या सामुग्री खर्चाचे मापदंड ६०:२०:२० प्रमाणात तीन वर्षात विभागून देण्यात आलेले आहेत.

५ सदरचा कार्यक्रम सन २०१४-१५ पासून लागू करण्यात यावा. तथापि, ज्या ठिकाणी सिंचनाची सोय आहे त्या ठिकाणी या वर्षीपासून लागू करण्यास हरकत नाही

परिशिष्ट-१ ब

# महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गतफळबाग लागवड कार्यक्रमाकरीता प्रति हेक्टर खर्चाचे मापदंड

(मजूरी दर रुपये १६२ प्रमाणे)

फळपिकाचे नाव- डाळिंब कलमे

हेक्टरी झाडे संख्या -४०० अंतर-५*५

| अ.क्र. | घटक | पहिले वर्ष | | | | दुसरे वर्ष | | | | तिसरे वर्ष | | | | एकुण | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक | |
| अ | लागवडपूर्व कामे | | | | दिन | | | | दिन | | | | दिन | | | | दिन | |
| १ | जमिन तयार करणे | ६४८० | ० | ६४८० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६४८० | ० | ६४८० | ४० | |
| २ | खड्डे खोदने | ८१०० | ० | ८१०० | ५० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८१०० | ० | ८१०० | ५० | |
| ३ | कुपन करणे | ९७२० | ० | ९७२० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ९७२० | ० | ९७२० | ६० | |
| | **एकुण अ** | **२४३००** | **०** | **२४३००** | **१५०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२४३००** | **०** | **२४३००** | **१५०** | |
| **ब** | **लागवड करणे** | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| १ | माती व खत मिश्रण खड्डे भरणे | ३२४० | ११७०० | १४९४० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३२४० | ११७०० | १४९४० | २० | |
| २ | कलमाची लागवड करणे | ३२४० | १२००० | १५२४० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३२४० | १२००० | १५२४० | २० | |
| | **एकुण ब** | **६४८०** | **२३७००** | **३०१८०** | **४०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **६४८०** | **२३७००** | **३०१८०** | **४०** | |
| | **एकुण(अ+ब)** | **३०७८०** | **२३७००** | **५४४८०** | **१९०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **३०७८०** | **२३७००** | **५४४८०** | **१९०** | |
| **क** | **परिरक्षण करणे** | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ६४८ | ० | ६४८ | ४ | ० | ० | ० | ० | ६४८ | ० | ६४८ | ४ | |
| २ | खते देणे | ० | ० | ० | ० | ३२४० | ५४०० | ८६४० | २० | ३२४० | ५४०० | ८६४० | २० | ६४८० | १०८०० | १७२८० | ४० | |
| ३ | आंतर मशागत | ४८६० | ० | ४८६० | ३० | ४८६० | ० | ४८६० | ३० | ४८६० | ० | ४८६० | ३० | १४५८० | ० | १४५८० | ९० | |
| ४ | पिकसंरक्षण | १६२० | १५०० | ३१२० | १० | १६२० | ३००० | ४६२० | १० | १६२० | ३००० | ४६२० | १० | ४८६० | ७५०० | १२३६० | ३० | |
| ५ | पाणी देणे | ६१५६ | ० | ६१५६ | ३८ | ६१५६ | ० | ६१५६ | ३८ | ६१५६ | ० | ६१५६ | ३८ | १८४६८ | ० | १८४६८ | ११४ | |
| ६ | इतर संकीर्ण | १६२० | ० | १६२० | १० | ८१० | ० | ८१० | ५ | ८१० | ० | ८१० | ५ | ३२४० | ० | ३२४० | २० | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकुण क | **१४२५६** | **१५००** | **१५७५६** | **८८** | **१७३३४** | **८४००** | **२५७३४** | **१०७** | **१६६८६** | **८४००** | **२५०८६** | **१०३** | **४८२७६** | **१८३००** | **६६५७६** | **२९८** | |
| | **एकुण(अ+ब+क)** | **४५०३६** | **२५२००** | **७०२३६** | **२७८** | **१७३३४** | **८४००** | **२५७३४** | **१०७** | **१६६८६** | **८४००** | **२५०८६** | **१०३** | **७९०५६** | **४२०००** | **१२१०५६** | **४८८** | |

१ पहिल्या वर्षी डाळिंब पिकाकरीता एकुण २७८ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यापैकी १९० मनुष्य दिवस लागवडपूर्व कामे व लागवड करण्याकरीता आहे त्यापैकी १०० मनुष्य दिवस लाभधारक कुटुंबास उर्वरित ९० मनुष्य दिवस दुस-या कुटुंबास तसेच ऑक्टोबर ते मार्च या कालावधीसाठी परिरक्षणाकरीता ८८ मनुष्य दिवस तिस-या कुटुंबास देय राहील.

२ दुस-या वर्षाकरीता जुलै व ऑगस्ट महिने वगळून दहा महिन्याकरीता परिरक्षणासाठी १०७ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यामध्ये लाभधारकास १०० दिवस व दुस-या कुटुंबातील व्यक्तीस ७ मनुष्य दिवस मजूरी देय राहील.

३ तिस-या वर्षाकरीता जुलै व ऑगस्ट महिने वगळून दहा महिन्याकरीता परिरक्षणासाठी १०३ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यामध्ये लाभधारकास १०० दिवस व दुस-या कुटुंबातील व्यक्तीस ३ मनुष्य दिवस मजूरी देय राहील.

४ ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांचे दिनांक२२/११/२०१३ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत देय असलेल्या सामुग्री खर्चाचे मापदंड ६०:२०:२० प्रमाणात तीन वर्षात विभागून देण्यात आलेले आहेत.

५ सदरचा कार्यक्रम सन २०१४-१५ पासून लागू करण्यात यावा. तथापि, ज्या ठिकाणी सिंचनाची सोय आहे त्या ठिकाणी या वर्षीपासून लागू करण्यास हरकत नाही